**राज्यातील पंचायत समित्यांना घसारा**
**निधीतून एक अतिरिक्त वाहन खरेदी**
**<u>करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत</u>**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः झेडपीए-२०१०/प्र.क्र. १५८/पंरा-१

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: १५ जून,२०१५

**वाचा :-**

1. **शासन निर्णय क्रमांकः जेईपी-१०९९/प्र क्र १९/०५, दि. ४ मे, १९९९**
2. **शासन निर्णय क्रमांकः जेईपी-१०९९/प्र क्र१२८/९९/०५, दि. ९ जुलै, १९९९**
3. **शासन निर्णय क्रमांकः जेईपी १०/प्र क्र.१९/०५, दि. २० डिसेंबर, २०००**
4. **शासन निर्णय क्रमांकः जेईपी १०/प्र क्र.४२/२००३/पंरा-१, दि. २१ फेब्रुवारी, २००३.**
5. **शासन निर्णय क्रमांकः जेईपी १०/२००२/प्र क्र.४७/पंरा-१, दि. ११ जानेवारी, २०१०.**
6. **शासन निर्णय क्रमांकः झेडपीए-२०१४/प्र क्र.१३२/पंरा-१, दि. १० जुलै, २०१४.**

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. १ व ३ अन्वये राज्यातील पंचायत समित्यांना अतिरिक्त वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि शासनाचे काटकसरीचे धोरण पाहता नवीन अतिरिक्त वाहन खरेदी करण्यास संदर्भ क्र. ४ अन्वये मान्यता नाकारण्यात आली होती. आता दिवसेंदिवस पंचायत समितीच्या कामकाजाचा व्याप वाढत आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार शासनाच्या अनेक योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. गट विकास अधिकारी/सहाय्यक गट विकास अधिकारी तसेच सभापती /उपसभापती यांना संपूर्ण तालुक्यातील विकास कामावर देखरेख ठेवावी लागते. काही तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती पाहता दुर्गम व डोंगराळ भागातील विकास कामांची पाहणी करण्याकरिता विविध गावात गट विकास अधिकारी व पंचायत समिती सभापती /उपसभापती यांना दौरे करावे लागतात. तथापि त्यांना स्वतंत्र वाहन नसल्यामुळे विकास योजनांची पाहणी करणे वेळोवेळी शक्य होत नाही, याचा परिणाम तेथील विकास कामांवर होतो. विकास कामांची विहित मुदतीत अंमलबजावणी व कामाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी गट विकास अधिकारी व सभापती यांनी पाहणी दौरे करणे आवश्यक आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता पंचायत समितीला सध्या उपलब्ध असलेल्या एका वाहनाव्यतिरिक्त आणखी एक वाहन उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ज्या पंचायत समित्यांकडे **सध्या एकच वाहन उपलब्ध आहे त्या पंचायत समित्यांना जिल्हा परिषदेच्या उपलब्ध घसारा निधीतून एक अतिरिक्त वाहन खरेदी करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे : -**

१. सदरची वाहने **फक्त जिल्हा परिषदेच्या घसारा निधीतून** खरेदी करण्यात यावीत.

२. वाहनाची खरेदी शासनाच्या दरकरारानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन १०११/प्र क्र ५८/११/विनियम, दिनांक २७ मार्च, २०१२ नुसार करण्यात येईल.

३. सदर वाहनासाठी लागणारा वाहनकर, विमा, इंधन आणि देखभाल दुरुस्तीचा खर्च जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांनी करावयाचा आहे. त्यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देय असणार नाही.

४. सदर वाहनांसाठी वाहन चालकांची नवीन पदे निर्माण करण्यात येणार नाहीत. उपलब्ध असणाऱ्या वाहनचालकाच्या सेवा यासाठी प्राप्त करुन घ्याव्यात.

५. ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. जेईपी १०/२००२/ प्र. क्र. ४७/पंरा-१, दिनांक ११ जानेवारी, २०१० अन्वये पंचायत समित्यांकडील वाहनांच्या वापराची वार्षिक मर्यादा, पेट्रोल वाहनाकरिता प्रतिवर्षी रु.४०,०००/- पर्यंत व डिझेल वाहनाकरिता प्रतिवर्षी रु.५०,०००/- पर्यंत इतकी निश्चित करण्यात आलेली आहे, ती याही वाहनांना ही लागू राहील.

६. पंचायत समितीकडे असणाऱ्या दोन वाहनांपैकी एक वाहन संपूर्णत: सभापती यांच्यासाठी यांच्यासाठी राखीव राहील. सभापती यांच्यासाठी राखीव असणारे वाहन उपसभापतींना महिन्यातून ७ दिवस कार्यालयीन कामासाठी सभापतींच्या पूर्वपरवानगीने उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच त्यापैकी दुसरे वाहन हे संपूर्णत: गट विकास अधिकारी यांच्यासाठी राखीव राहील. गट विकास अधिकारी यांच्यासाठी राखीव असणारे वाहन महिन्यातून ७ दिवस सहाय्यक गट विकास अधिकारी यांना कार्यालयीन कामासाठी गट विकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने उपलब्ध करुन देण्यात येईल.

७. परि. ६ मध्ये नमूद केल्यानुसार जे वाहन ज्या पदाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेले असेल ते त्याच पदाकरिता वापरण्यात यावे. तसेच त्या वाहनाचे निर्लेखन केल्यानंतर त्याच पदासाठी नवीन वाहन विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने खरेदी करण्यात यावे.

८. ज्या पंचायत समित्यांकडे स्वत:च्या उत्पन्नातून किंवा इतर माध्यमातून अगोदरच दोन वाहने खरेदी केली आहेत त्यांना अतिरिक्त वाहन खरेदी करता येणार नाही.

९. सदर वाहन जिल्हा परिषदेच्या घसारा निधीमधून खरेदी करताना घसारा निधीची उपलब्धता विचारात घेऊन आवश्यकतेनुसारच टप्प्याटप्प्याने वाहन खरेदी करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६१५१३३९४६०८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=415001, st=Maharashtra, cn=Girish Dinkar Bhalerao
Date: 2015.06.15 17:30:38 +05'30'

**गि. दि. भालेराव**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

३) मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

४) मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

५) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, ग्राम विकास विभाग.

६) मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, ग्राम विकास विभाग.

७) मा. विधानसभा व मा. विधानपरिषद सदस्य (सर्व)

८) मा.प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहाय्यक.

९) मा.प्रधान सचिव (जलसंधारण ) यांचे स्वीय सहाय्यक.

१०) विभागीय आयुक्त (सर्व).

११) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व).

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१३) मा सभापती, पंचायत समिती (सर्व)(मुख्य कार्यकारी अधिकारी मार्फत)

१४) सर्व सह सचिव/ उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई

१७) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर

१८) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.

१९) उप मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती.

२०) निवड नस्ती, कार्यासन क्र. पंरा-१, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

**********